**L. A. BILL No. VI OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१४ चा महा. २९.

**ज्याअर्थी** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ६ मध्ये, " माध्यम इंग्रजी " या मजकुरानंतर, " किंवा मराठी " हा मजकूर, जादा दाखल करण्यात येईल आणि तो, २० जुलै २०२३ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

२०१४ चा महा. २९.

व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांत, विनियमांत, परिनियमांत अथवा अध्यादेशांत किंवा, यथास्थिति, काढलेल्या कोणत्याही आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, मराठी भाषेतून चालविला जात असलेला कोणताही पदवी अभ्यासक्रम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, याद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमानुसार चालविण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

२०२४ चा महा. .....

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. २९), याच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की, प्रमाणपत्र स्तरापर्यंतच्या पाठ्यक्रमांच्या शिक्षणाचे व परीक्षांचे माध्यम, मराठी व इंग्रजी असेल तर, प्रमाणपत्र स्तरानंतरच्या पाठ्यक्रमांच्या शिक्षणाचे व परीक्षांचे माध्यम इंग्रजी असेल.

२. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनइपी) २०२० मध्ये, उच्च शिक्षणामधील शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतीय भाषांचा समावेश करण्यावर भर दिला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुरुप, उक्त विद्यापीठाने, २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षापासून, मराठी भाषेमध्ये इलेक्ट्रॉनिक व दूरसंचार अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम सुरू केला आहे आणि मराठी भाषेत परीक्षा देखील घेतलेली आहे.

३. म्हणून, उक्त विद्यापीठाने केलेल्या विनंतीवरून, उक्त विद्यापीठातील प्रमाणपत्र स्तरानंतरच्या पाठ्यक्रमांच्या शिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये भर दिल्याप्रमाणे, मराठी असेल यासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये सुधारणा करणे तसेच आवश्यक असलेल्या व्यावृत्ती खंडाची तरतूद करणे आवश्यक आहे, असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२४ चे वि.स. विधेयक क्रमांक ६.—डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट

**(डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यातील उतारे.)**

**(सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)**

**१.** ते **५.** ** ** **

**६.** प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शिक्षणाचे व परिक्षांचे माध्यम मराठी किंवा इंग्रजी भाषा असेल तर त्यानंतरच्या अभ्यासक्रमांच्या शिक्षणाचे व परीक्षांचे माध्यम इंग्रजी भाषा असेल. विद्यापीठाचे शिक्षणाचे व परीक्षांचे माध्यम.

**७.** ते **१११.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६. ]**

**[ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई